# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

**महा मेट्रो नागपूर आणि स्विच ई-राइड यांच्यात सामंजस्य करार**

**स्विच ई-राइड देणार ई-स्कूटर शेअरिंग सेवा**

**फस्ट अँड लास्ट माईल जोडणी सुधारण्यासाठी पुढाकार**



नागपूर : नागपूर मेट्रोच्या पहिल्या आणि शेवटच्या मैल जोडणीला चालना देण्यासाठी, महा मेट्रो नागपूर आणि टी एस स्विच ई-राइड प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात मेट्रो भवन येथे सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पाचा उद्देश कमी खर्चिक, पर्यावरणपूरक वाहतूक पर्याय प्रदान करणे आहे, जो मेट्रो प्रणालीस पूरक ठरेल.

या उपक्रमाद्वारे नागपूर शहरातील सर्व मेट्रो स्थानकांवर ई-स्कूटर सहज उपलब्ध करून देण्यात येतील. नागपूर मेट्रो स्विच ई-राइडच्या सहकार्याने या ई-स्कूटर शेअरिंग उपक्रमाद्वारे नागरी गतिशीलतेसाठी नवा आदर्श प्रस्थापित करत आहे.

सेवेची वैशिष्ट्ये:

1. सुविधाजनक प्रवेश : मेट्रो स्थानकांच्या जवळच ई-स्कूटरसाठी समर्पित पार्किंगची व्यवस्था करण्यात येईल जी प्रवाशांसाठी सोयीस्कर असेल.

2. ॲप-आधारित सेवा: वापरकर्ते स्मार्टफोन ॲपद्वारे राइड बुकिंग, ट्रॅकिंग, आणि पेमेंट करू शकतील. ॲप ई-स्कूटरची उपलब्धता, प्रवास मार्ग, आणि खर्च याची अति शीघ्र माहिती पुरवेल.

3. सुरक्षितता आणि देखभाल: ई-स्कूटर नियमितपणे देखभाल केली जाईल. कर्मचारी पोलीस तपासणीद्वारे नियुक्त केले जातील आणि सरकारी नियमांचे पालन केले जाईल.

4. पर्यावरणपूरक वाहतूक: हा उपक्रम नागपूर मेट्रोच्या वचनबद्धतेला पाठिंबा देतो, इलेक्ट्रिक मोबिलिटीद्वारे कार्बन उत्सर्जन आणि शहरी रहदारी कमी करतो.

5. एकत्रित गतिशीलता: ई-स्कूटर सेवा मेट्रोच्या वेळापत्रकानुसार चालेल, पहिल्या गाडीच्या १५ मिनिटे आधीपासून शेवटच्या गाडीच्या १५ मिनिटांपर्यंत सुरू राहील.

प्रवाशांसाठी फायदे :

- मेट्रोशी थेट जोडलेली नसलेल्या ठिकाणांवर पोहोचण्यासाठी स्वस्त आणि लवचिक प्रवास पर्याय.

- मोबाइल वॉलेटद्वारे सहज पेमेंट पर्याय.

- सुरक्षित आणि अडथळामुक्त प्रवास अनुभवासाठी रिअल-टाइम अलर्ट आणि ट्रॅकिंग.

आव्हाने पूर्ण करणार :

हा उपक्रम शहरी वाहतुकीच्या अडचणींना जसे की वाहतूक कोंडी, प्रदूषण, आणि दुर्गम भागांतील अपुरी जोडणी दूर करण्यासाठी महत्त्वाचा आहे. यात चोरी, तोडफोड, आणि देखभालीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतील.

हा उपक्रम नागपूरकरांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर, टिकाऊ, आणि कार्यक्षम बनवण्याचे आश्वासन देतो. मेट्रोच्या प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ करण्यासह, नागरी वाहतुकीसाठी हा प्रकल्प नवी परिभाषा निर्माण करेल. तसेच, स्थानिक नियोजन प्राधिकरणांसह समन्वय साधून डॉकिंग स्थानके निश्चित करण्यासाठी नागपूर मेट्रो कार्यरत आहे, जेणेकरून सेवेचा अधिक चांगला विस्तार करता येईल.